**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ५**

दिनांक :- १०/१०/२०१२ वेळ :- १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. १०/१०/२०१२ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. भोंडवे मोरेश्वर महादू | सदस्य |
| ६. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ७. | मा. लोंढे गणेश नारायण | सदस्य |
| ८. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ९. | मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| १०. | मा. चिंचवडेपाटील अश्विनी गजानन | सदस्य |
| ११ | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| १२. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १३ | मा. शेट्टी प्रसाद | सदस्य |
| १४. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| १५. | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १६. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १७. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १८. | मा. कदम सदगुरु महादेव | सदस्य |
| १९. | मा. कदम कैलास महादेव | सदस्य |
| २०. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| २१. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |
| २२. | मा. आसवानी सविता धनराज | सदस्य |
| २३. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |
| २४. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य.अभियंता मकरंद निकम, शरद जाधव, प्रशासन अधिकारी एस.एन. राऊत, लेखाधिकारी सुरेश आव्हाळे, उपअभियंता एम. डी. पाटोदकर, एस.डी. वाघुंडे, व्ही.एन.देसले, एम.एम. चव्हाण, एस.एस.मोरे, डी. एन. गट्टूवार, श्रीम.मोमीन, पवार आर. एस., बी.बी.बोत्रे, संजय कांबळे, सौ एस.एन.वाघ, इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

मागील सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

प्रशासन अधिकारी (सभाशाखा) ब प्रभाग समिती यांनी विषयपत्राचे वाचन केले. तदनंतर मा. अध्यक्षांचे परवानगीने खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेतले.

विषय क्र. ३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. ४१ खराळवाडी (गांधीनगर) येथे जवळपास पन्नास हजारापेक्षा जास्त लोकसंख्या आहे. तेथे मिळत असलेले पाणी ही वारंवार मोठी समस्या निर्माण झाली आहे. तरी प्रभाग क्र. ४१ मध्ये एक नविन पाण्याची टाकी बांधावी हि विनंती.

विषय क्र. ४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. ४१ (खराळवाडी) गांघीनगर येथे गटारे व नाले ही उघडी आहेत त्यामुळे मोठा धोका होतोय अनेक प्रसंग (गंभीर) त्या ठिकाणी घडलेले आहेत. तरी याबाबत कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

कामगारनगरमधील साई पॅराडाईज इमारतीजवळील चौकास कै. करबसप्पा मेंगशेट्टी असे नांव देणेत यावे ही विनंती.

सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेत यावी.

विषय क्र. ६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २० मधील रेल विहार पासून शिवनगरी गणपती मंदिरापर्यंत जाणा-या रस्त्याला कै.अक्षय जितेंद्र पाटील मार्ग असे नांमकरण करण्यात यावे. ही विनंती.

सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता कारवाई करावी.

विषय क्र. ७ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीमध्ये अजमेरा कॉलनी, वास्तु उद्योग कॉलनी हे भाग येतात. प्रभागातील नागरिकांच्या मागणीनुसार वरील दोन्ही ठिकाणी सिमा भिंत बांधणेत यावी. सदर विषयबाबत सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी.

विषय क्र. ८ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीमध्ये यशवंतनगर हा भाग येत असून प्रभागातील नागरिकांच्या मागणीनुसार यशवंतनगर येथे कमान बांधणेत यावी. सदर विषयाबाबत सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी.

विषय क्र. ९ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीतील उद्यमनगर ते अंतरिक्ष सोसायटी येथे मनपाने नाला बांधला असून सदर नाल्याचे काम अर्धवट झालेले आहे. तरी सदर नाला पुर्णपणे बांधणेत यावा.

विषय क्र. १० विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पडवळआळी या ठिकाणी मनपाच्या आरोग्य विभागाचे ऑफीस आहे. त्या ठिकाणी रस्त्याच्या बाजुला जागा उपलब्ध असल्यामुळे परिसरातील नागरीक त्याठिकाणी बसण्यासाठी वापरतात त्या जागेवर चांगल्या प्रकारचे वाचनालय बसविणेत यावे.

विषय क्र. ११ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

भोईरनगर चौकातील मुतारी काढून सदर चौक सुशोभित करावा.

विषय क्र. १२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र.२० मधील श्रीराम ऑटो मोबाईल ते नवकार भवन या रस्त्याचे कै. विष्णुपंत तबाजी नलावडे मार्ग असे नांमकरण करण्यात यावे. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता कारवाई करावी.

विषय क्र. १३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. ३९ संत तुकारामनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रिडा मैदानात वारंवार स्पर्धा होत असुन मैदानातील गवत येण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात असल्याने गवत काढण्याकामी मनपा कर्मचारी कमी पडत असुन सदर मैदानातील गवत हे गवत काढण्याच्या मशिनव्दारे काढणे सोयीचे होईल तसेच या सुविधेचा वापर सर्वत्र करण्यास सोयीचे ठरेल. त्यासाठी गवत काढण्याचे मशिन खरेदी करण्यात यावे.

विषय क्र. १४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

मोरवाडी प्रभाग क्र.२७ मध्ये लालटोपीनगर झोपडपट्टी असून त्या ठिकाणी असणारे टॉयलेट ब्लॉक कमी पडत आहेत. व लोकांची गैरसोय होत असलेने जुने टॉयलेट ब्लॉक काढून दुमजली टॉयलेट ब्लॉक बसवून देणेत यावेत.

विषय क्र. १५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

म्हाडा कॉलनी मोरवाडी येथे संत ज्ञानेश्वर नगर म्हाडा कॉलनी या नावांची कमान असून कमानीचा पुर्ण रंग निघाला असून गंज लागला आहे. तरी ती कमान काढून त्या ठिकाणी सिमेंटची कमान बांधून रंगरंगोटी करावी.

विषय क्र. १६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २३ मधील विवेक वसाहत रस्त्याच्या शेवटी नदीला घाट बनवून मिळावा जेणेकरुन नागरिकांना नदीचा वापर करणे सोयीस्कर होईल.

विषय क्र. १७ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरी येथील बी ब्लॉक ३२ येथे पुर्वीचे बांधलेले शौचालय बिकट स्थितीत असून, सदर शौचालयाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे.

तरी सदर शौचालयाचे बांधकाम पाडून सदर ठिकाणी तेथे नवीन आधुनिक पध्दतीचे उच्च दर्जाची मुतारी (स्त्री/पुरुष) बांधणेबाबत विनंती.

विषय क्र. १८ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरीनगर येथील शगुन चौकास अद्‌याप नांव दिलेले नसून केवळ शगुन कापडाचे दुकान असल्यामुळे त्यास शगुन चौक असे म्हणतात तरी या चौकास स्वर्गीय राधामल जोधवानी असे नामकरण करण्यात यावे.

विषय क्र. १९ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

डिलक्स सिनेमागृह चौकातून काळेवाडीकडे जाणा-या रस्त्यावर एक दिशादर्शक कमान तसेच डिलक्स सिनेमा गृह चौकातून पिंपरी गांवाकडे जाणा-या रस्त्यावर एक दिशादर्शक कमान अशा दोन दिशादर्शक कमानी लावाव्यात.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली

सूचक - मा. भोंडवे मोरेश्वर महादू अनुमोदक : मा. पालांडे सुजाता सुनिल

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वर्धापनदिनाचे निमंत्रण पत्रिकेमध्ये मा. अजितदादा पवार यांचे नांव घातले नसलेने सभा बुधवार दि. १७/१०/२०१२ रोजी दु.१२.०० वाजेपर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य करणेत आली.

मा. अध्यक्षा ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांनी सदर सभा दि. १७/१०/२०१२ रोजी दु. १२.०० वाजेपर्यंत तहकूब केल्याचे सांगितले व सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
[ ठाकरे मंदाकिनी अर्जुन ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ५**

**( माहे ऑक्टोबर ची तहकूब सभा )**

दिनांक :- १७/१०/२०१२ वेळ :- १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर ची तहकूब सभा बुधवार दि. १७/१०/२०१२ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ६. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ७. | मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ८. | मा. चिंचवडेपाटील अश्विनी गजानन | सदस्य |
| ९ | मा. शेट्टी प्रसाद | सदस्य |
| १०. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| ११. | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १२. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १३. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १४. | मा. कदम सदगुरु महादेव | सदस्य |
| १५. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| १६. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य.अभियंता मकरंद निकम, रामदास जाधव, ए.ए.पठाण प्रशासन अधिकारी एस.एन. राऊत, लेखाधिकारी सुरेश आव्हाळे, उपअभियंता एम. डी. पाटोदकर, एस.डी. वाघुंडे, व्ही.एन.देसले, एम.एम. चव्हाण, एस.एस.मोरे, श्रीम.मोमीन, पवार आर. एस., उद्यान जी.आर.गोसावी, डी.के.बैचे, प्र.सहा.आरोग्याधिकारी .डी. दरवडे इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली

सूचक - मा. मासुळकर समीर मोरेश्वर अनुमोदक : मा. मंचरकर गिता सुशिल

प्रभाग क्र.२७,२८,३९,४०,४१ या भागात पाणी पुरवठयाबाबत तक्रारी असताना पेपरला २४ तास पाणी पुरवठा अशी बातमी श्री प्रविण लडकत यांनी दिली आहे त्यामुळे नागरिकांचे

रोषाला सन्मा नगरसदस्यांना जावे लागत आहे. याचा निषेध म्हणून आजची सभा बुधवार दि. २१/११/२०१२ रोजी दु. ११.४५ वाजेपर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य करणेत आली.

मा. अध्यक्षा ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांनी सदर सभा दि. २१/११/२०१२ रोजी दु. ११.४५ वाजेपर्यंत तहकूब केल्याचे सांगितले व सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
[ ठाकरे मंदाकिनी अर्जुन ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ५**

**( माहे ऑक्टोबर ची तहकूब सभा )**

दिनांक :- २१/११/२०१२ वेळ :- ११.४५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर ची तहकूब सभा बुधवार दि. २१/११/२०१२ रोजी दु. ११.४५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ६. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ७. | मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ८ | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| ९. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १०. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| ११. | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १२. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १३. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १४. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| १५. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १६. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य.अभियंता मकरंद निकम, शरद जाधव, रामदास जाधव, प्रशासन अधिकारी एस.एन. राऊत. इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली

सूचक - मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव अनुमोदक : मा. पालांडे सुजाता सुनिल

महाराष्ट्राचे लाडके नेते आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांचे दुखद निधन झाले असलेने त्यांना श्रध्दांजली वाहून सभा सोमवार दि. २६/११/२०१२ रोजी स.११.४५ वाजेपर्यंत तहकूब करण्यात यावी.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

सदर सूचना सर्वानुमते मान्य करणेत आली.

मा.अध्यक्षा - सभा सोमवार दि. २६/११/२०१२ रोजी स.११.४५ वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे..

सही/-

[ ठाकरे मंदाकिनी अर्जुन ]

अध्यक्ष

ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रशासन अधिकारी

सभाशाखा, ब प्रभाग समिती

पि.चिं.मनपा, चिंचवड-३३

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ५**

**( माहे ऑक्टोबर ची तहकूब सभा )**

दिनांक :- २६/११/२०१२ वेळ :- ११.४५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर ची तहकूब सभा सोमवार दि. २६/११/२०१२ रोजी दु. ११.४५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ६. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ७. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ८. | मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ९. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| १० | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| ११. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १२. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १३. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| १४. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १५. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |
| १६. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य.अभियंता मकरंद निकम, शरद जाधव, रामदास जाधव, प्रशासन अधिकारी एस.एन. राऊत.उपअभियंता एम.एम. चव्हाण,एस.एन.वाघुंडे, एम.डी.पाटोदकर, व्ही.एन.देसले, आर.पवार, व्ही. सी. काळे एस.एस. मोरे, डॉ. गोरे, सहा.आरोग्याधिकारी एन.एम.नाईक, कार्या. अधि. अतिक्रमण बी.टी. बो-हाडे, उद्यान एस.पी. बनसोडे, इत्यादी.

सर्वप्रथम मा. अ¬ध्यक्ष मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

ठराव क्र.२५ विषय क्र.१

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. सविता धनराज आसवानी अनुमोदक : मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव

संदर्भ : मा. सविता धनराज आसवानी यांचे दि.२०/०९/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरीनगर सुभाषनगर येथील घाटावर दरवर्षी सिंधी समाजाचा चालिया उत्सव साजरा केला जातो. सदर उत्सव हा ४० दिवसांचा असतो.

हा उत्सव पर्जन्य देवतेचा आहे. त्यामुळे घाटवर संपुर्ण समाज एकत्र येवून पुजा करतात. सदर ठिकाणी मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. सांडपाण्यामुळे घाट प्रदुषित होतो. भाविक नदीचे पाणी पितात, म्हणून या सुभाषनगर घाटावर वर्तुळाकार घाट बनविणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.२६ विषय क्र.२
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा. सविता धनराज आसवानी अनुमोदक : मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
संदर्भ : मा. सविता धनराज आसवानी यांचे दि.२०/०९/२०१२ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरीनगर येथील पवना नदीवरील घाटास झुलेलाल असे नामकरण करणेस मंजुरी देणेत आली

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.२७ विषय क्र.३
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा. कदम कैलास महादेव अनुमोदक : मा. शेट्टी प्रसाद
संदर्भ : मा. कदम कैलास महादेव यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. ४१ खराळवाडी (गांधीनगर) येथे जवळपास पन्नास हजारापेक्षा जास्त लोकसंख्या आहे. तेथे मिळत असलेले पाणी ही वारंवार मोठी समस्या निर्माण झाली आहे. तरी प्रभाग क्र. ४१ मध्ये एक नविन पाण्याची टाकी बांधाणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.२८ विषय क्र.४
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा. कदम कैलास महादेव अनुमोदक : मा. शेट्टी प्रसाद
संदर्भ : मा. कदम कैलास महादेव यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. ४१ (खराळवाडी) गांधीनगर येथे गटारे व नाले ही उघडी आहेत त्यामुळे मोठा धोका होतोय अनेक प्रसंग (गंभीर) त्या ठिकाणी घडलेले आहेत. तरी याबाबत योग्य कार्यवाही होणेस मान्यता देणेत आली.

. ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.२९ विषय क्र.५
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा. कदम सदगुरु महादेव अनुमोदक : मा. शिंदे विजय गोरख
संदर्भ : मा. कदम सदगुरु महादेव यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

कामगारनगरमधील साई पॅराडाईज इमारतीजवळील चौकास कै. करबसप्पा मेंगशेट्टी असे नांव देणेस मान्यता देणेत आली.

सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेत यावी..

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.३० विषय क्र.६

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर अनुमोदक : मा. शमीम पठाण

संदर्भ : मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २० मधील रेल विहार पासून शिवनगरी गणपती मंदिरापर्यंत जाणा-या रस्त्याला कै.अक्षय जितेंद्र पाटील मार्ग असे नामकरण करणेस मान्यता देणेत आली.

सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता कारवाई करावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.३१ विषय क्र.७

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. साळुंके सविता सुरेश अनुमोदक : मा. शेट्टी प्रसाद

संदर्भ : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीमध्ये अजमेरा कॉलनी, वास्तु उद्योग कॉलनी हे भाग येतात. प्रभागातील नागरिकांच्या मागणीनुसार वरील दोन्ही ठिकाणी सिमा भिंत बांधणेस मान्यता देणेत आली.

सदर विषयबाबत सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी.
.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.३२ विषय क्र.८

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. साळुंके सविता सुरेश अनुमोदक : मा. शेट्टी प्रसाद

संदर्भ : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीमध्ये यशवंतनगर हा भाग येत असून प्रभागातील नागरिकांच्या मागणीनुसार यशवंतनगर येथे कमान बांधणेस मान्यता देणेत आली.

सदर विषयबाबत सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी.
.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.३३ विषय क्र.९

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. साळुंके सविता सुरेश अनुमोदक : मा. शेट्टी प्रसाद

संदर्भ : मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीतील उद्यमनगर ते अंतरिक्ष सोसायटी येथे मनपाने नाला बांधला असून सदर नाल्याचे काम अर्धवट झालेले आहे. तरी सदर नाला पुर्णपणे बांधणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.३४ विषय क्र.१०
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव अनुमोदक:मा.चिंचवडेपाटील अश्विनी गजानन
संदर्भ : मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पडवळआळी या ठिकाणी मनपाच्या आरोग्य विभागाचे ऑफीस आहे. त्या ठिकाणी रस्त्याच्या बाजुला जागा उपलब्ध असल्यामुळे परिसरातील नागरीक त्याठिकाणी बसण्यासाठी वापरतात त्या जागेवर चांगल्या प्रकारचे वाचनालय बसविणेस मान्यता दिली..

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.३५ विषय क्र.११
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.शमीम पठाण अनुमोदक: मा.चिंचवडेपाटील अश्विनी गजानन
संदर्भ : मा.शमीम पठाण यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

भोईरनगर चौकातील मुतारी काढून सदर चौक सुशोभित करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.३६ विषय क्र.१२
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर अनुमोदक : मा.शमीम पठाण
संदर्भ : मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २० मधील श्रीराम ॲटो मोबाईल ते नवकार भवन या रस्त्याचे कै. विष्णुपंत तबाजी नलावडे मार्ग असे नामकरण करण्यास मान्यता दिली.

सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता कारवाई करावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.३७ विषय क्र.१३
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.पालांडे सुजाता सुनिल अनुमोदक: मा.साळुंके सविता सुरेश
संदर्भ : मा.पालांडे सुजाता सुनिल यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. ३९ संत तुकारामनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रिडा मैदानात वारंवार स्पर्धा होत असुन मैदानातील गवत येण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात असल्याने गवत काढण्याकामी मनपा कर्मचारी कमी पडत असुन सदर मैदानातील गवत हे गवत काढण्याच्या मशिनव्दारे काढणे सोयीचे होईल तसेच या सुविधेचा वापर सर्वत्र करण्यास सोयीचे ठरेल. त्यासाठी गवत काढण्याचे मशिन खरेदी करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.३८ विषय क्र.१४
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.साळुंके सविता सुरेश अनुमोदक: मा.पालांडे सुजाता सुनिल
संदर्भ : मा.साळुंके सविता सुरेश यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मोरवाडी प्रभाग क्र.२७ मध्ये लालटोपीनगर झोपडपट्टी असून त्या ठिकाणी असणारे टॉयलेट ब्लॉक कमी पडत आहेत. व लोकांची गैरसोय होत असलेने जुने टॉयलेट ब्लॉक काढून दुमजली टॉयलेट ब्लॉक बसवून देणेस मान्यता दिली..

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.३९ विषय क्र.१५
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.साळुंके सविता सुरेश अनुमोदक: मा.पालांडे सुजाता सुनिल
संदर्भ : मा.साळुंके सविता सुरेश यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

म्हाडा कॉलनी मोरवाडी येथे संत ज्ञानेश्वर नगर म्हाडा कॉलनी या नावांची कमान असून कमानीचा पुर्ण रंग निघाला असून गंज लागला आहे. तरी कमान काढून त्या ठिकाणी सिमेंटची कमान बांधून रंगरंगोटी करणेचे कामास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.४० विषय क्र.१६
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक: मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव
संदर्भ : मा.को-हाळे अनंत सुभाष यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २३ मधील विवेक वसाहत रस्त्याच्या शेवटी नदीला घाट बनवून मिळावा जेणेकरुन नागरिकांना नदीचा वापर करणे सोयीस्कर होईल.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.४१ विषय क्र.१७
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.आसवानी सविता धनराज अनुमोदक: मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव
संदर्भ : मा.आसवानी सविता धनराज यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी येथील बी ब्लॉक ३२ येथे पुर्वीचे बांधलेले शौचालय बिकट स्थितीत असून, सदर शौचालयाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे.
तरी सदर शौचालयाचे बांधकाम पाडून सदर ठिकाणी तेथे नवीन आधुनिक पध्दतीचे उच्च दर्जाची मुतारी (स्त्री/पुरुष) बांधणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.४२ विषय क्र.१८
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव अनुमोदक: मा.आसवानी सविता धनराज
संदर्भ : मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरीनगर येथील शगुन चौकास अद्याप नांव दिलेले नसून केवळ शगुन कापडाचे दुकान असल्यामुळे त्यास शगुन चौक असे म्हणतात तरी या चौकास स्वर्गीय राधामल जोधवानी असे नामकरण करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.४३ विषय क्र.१९

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव अनुमोदक: मा.आसवानी सविता धनराज

संदर्भ : मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव यांचे दि.१०/१०/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

डिलक्स सिनेमागृह चौकातून काळेवाडीकडे जाणा-या रस्त्यावर एक दिशादर्शक कमान तसेच डिलक्स सिनेमा गृह चौकातून पिंपरी गांवाकडे जाणा-या रस्त्यावर एक दिशादर्शक कमान अशा दोन दिशादर्शक कमानी लावाव्यात.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षा ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
[ ठाकरे मंदाकिनी अर्जुन ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रति,
सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३

क्र. एएमसी/बप्र२/कावि/३३५/२०१२, दि.१०/१२/२०१२